

# जर सत्याचे ज्ञान तुम्हांस असते - 2
## तर कदाचित तुमचे विचारच बदलून गेले असते

मदर टेरेसा एक बहुश्रूत बहूपरिचित नाव आहे. नोबेल पुरस्कृत नाव. नाव घेताच ते मनात ठसते. मनात एक संत, जिने युरोपातील सुखाचा व ऐश्वर्याचा त्याग करून आपले सारे आयुष्यच खर्ची घातले अशा लोकांसाठी ज्यांची सेवा करण्यास कोणीही उपलब्ध नव्हते अशी संत असा भाव दाटतो. असे म्हणतात की हिंदूनी आपल्याच लोकांना रस्त्यावर मरताना सोडून दिले. तेव्हा अर्विभाव झाला एका ईसाई देवीचा. जिने या त्याजित अनाथांना आपल्या हृदयाशी कवटाळले, आश्रय दिला, त्यांची सेवा केली व स्वस्थ केले. पण ही कहाणी पूर्ण आहे का?

# ईसाई धर्मातील तृतीय वैशिष्ट्य - धनलोलुपतेची पराकाष्ठा

(कृपया या पुस्तकाचा भाग 1 अगोदर वाचवा, अन्यथा आम्ही पुढे जे सांगणार आहोत ते कोणत्या संदर्भात सांगत आहोत हे तुमच्या लक्षात येणार नाही)

हे जे अब्जावधी रूपये खर्च करतात आपले चर्च केवळ पाद-यांच्या लंपटते पोटी तो सारा पैसा येतो कोठून? पाहू या पैशांच्या स्रोतांपैकी एक -

## ईसाई पोपाच्या संरक्षणार्थ ईसाई आर्कबिशपाचे मादक पदार्थांचा अवैध व्यापारात संमिलित होणे

इंग्लंड, जर्मनी, स्विर्झलंड तसेच इटली या देशांत ज्या चौकश्या केल्या गेल्या त्यावरून हे कळून आले की वेटीकन फारच मोठया प्रमाणात विश्वव्यापी मादक पदार्थांच्या अवैध व्यापारात संमिलित आहे. वेटीकन बँक अनेक वर्षांपासून मादक पदार्थांसंबधी धनाची देवघेव करीत आली आहे. त्यांचे संबंध मादक पदार्थांच्या अवैध व्यापा-यांशी फार घनिष्ट आहेत. धर्मगुरू मार्किन्कस वेटिकन बँकेचे सर्वश्रेष्ट अधिकारी आहेत जे बँकेच्या प्रशासनाचा कारभार सांभाळतात. अनेक देशांची पोलीस यंत्रणा त्यांच्या मागावर आहे.

ISBN 81-85990-52-2, p 135

धर्मगुरू मार्किन्कस यांना कैद करणे जमले नाही कारण ते वेटीकनबाहेर कधी पाउल ठेवत नाहीत. पोपंच्या आज्ञेविना अन्य देशांचे पोलीस वेटीकनमध्ये घूसुन त्यांना कैद करू शकत नाहीत. पोप त्यांना वेटीकनमध्ये घुसण्याची परवानगी देत नाहीत. कारण त्यांच्या आर्शीवादाविना धर्मगुरू मार्किन्सकने अशा अवैध धंद्याचा आरंभच करू शकला नसता. *विचार करा अशा मादक पदार्थांना प्रोत्साहन देऊन आपल्या किशोरांना, नवयुवकांना, कसल्या अधःपतनाच्या गर्तेत ढकलण्याचा उद्योग ते करीत आहेत?*

वेटीकन सिटी ज्यात पोप निवास करतात, त्या शहरांस 1929 सालापासून स्वतंत्र प्रभुसत्ता संपन्न राज्याची मान्यता प्राप्त झाली आहे. जगात इतर कोणत्याही धर्मसंप्रदायांस हा अधिकार मिळाला नाही.

The Times of India, Mumbai edition, 17 Nov 2004, Editorial

मे 1993 - काही वर्षांपूर्वीची घटना आहे -

मेक्सिकोच्या धमार्धिकारी कार्डिनल पोसादासओकाम्पोचा गुआडलाजारा एअरपोर्टवर खून केला गेला.

ISBN 81-85990-52-2, p 135

पोपनंतर कार्डिनल सर्वोच्च धमार्धिकारी असतात. चैकशी अंती आढळले की आपले पूज्य धर्मगुरू एका एजंटच्या (प्रतिनिधीच्या) रूपात कार्यरत होते. कोणाचे एजंट? कोलंबियाचे कुख्यात

पाबलो एस्कोबारचे एजंट - कोण होते हे पाबलो एस्कोबार? एक ड्रग लॉर्ड अर्थात मादक पदार्थांच्या व्यवसायात एक अधिपती. ही केवळ एक चुणूक झाली. अशा अनेक कलंकित घटना घडलेल्या आहेत. अधिक विवरणासाठी वाचा ISBN 81-85990-52-2 (p 135)

## मदर टेरेसाचे हे रूप जे तुम्ही कदाचित पाहिले नसेल

मदर टेरेसा एक बहुश्रूत बहूपरिचित नाव आहे. नोबेल पुरस्कृत नाव. नाव घेताच ते मनात ठसते. मनात एक संत, जिने युरोपातील सुखाचा व ऐश्वर्याचा त्याग करून आपले सारे आयुष्यच खर्ची घातले अशा लोकांसाठी ज्यांची सेवा करण्यास कोणीही उपलब्ध नव्हते अशी संत असा भाव दाटतो. असे म्हणतात की हिंदूनी आपल्याच लोकांना रस्त्यावर मरताना सोडून दिले. तेव्हा अर्विभाव झाला एका ईसाई देवीचा, जिने या त्याजित अनाथांना आपल्या हृदयाशी कवटाळले, आश्रय दिला, त्यांची सेवा केली व स्वस्थ केले. पण ही कहाणी पूर्ण आहे का?

### आपल्या हया मूर्तिमंत दयेस अपराधी फार प्रिय होते

उदाहरणच हवे असेल तर घ्या चार्ल्स कीटिंगचे जो कॅलिफोर्नियाच्या कारागृहात शिक्षा भोगीत आहे आणि रॉबर्ट मॅक्सवेल, ज्याने आत्महत्या केली, जेव्हा त्यास कळले की स्कॉटलंड यार्डने यथेष्ट प्रमाणे प्राप्त केली आहेत आणि आता आपण वाचू शकत नाहीत. दोहोंनी शेकडो मिलियन (अब्जावधी) डॉलर बेईमानीने कमवले होते, जनसामान्यांना धोका देऊन. कॅलिर्फोनियाचे डेप्यूटी डिस्ट्रिक्ट ॲटर्नी पॉल टर्ने, ज्यांनी सरकारी पक्षातर्फे अभियोग चालविला होता, त्यानी सांगितले की कीटिंगने 900 मिलियन डॉलर (एक डॉलर म्हणजे 43 रू.च्या हिशोबाने 38 अब्ज 70 कोटी रू.) हून आधिक चोरी केली होती. त्यांनी असे लिहिले की हे सारे लोक ज्यांचा पैसा बुडाला, ते सर्व अगदी साधारण आय (उत्पन्न) असणारे लोक होते, ज्यांना अशा प्रकारांच्या घोटाळयांची कल्पना नव्हती.

कीटिंगने एक मिलीयन डॉलर (4 कोटी 30 लाख रू.) हून अधिक धन टेरेसांना का दिले? जेव्हा त्यांच्यावर अभियोग चालू होता तेव्हा मदर टेरेसानी जज लॉन्स आइटोस याना लिहिले की कीटिंग सर्वदा ईश्वराच्या प्रिय गरिंबां प्रत दयाळू व दाता राहिला आहे. मदर टेरिसाने न्यायाधीशांस राज्यक्षमेची प्रार्थना करीत लिहीले की कीटिंगच्या हृदयात डोकावून पाहा आणि विचार करा येशूने अशा स्थितीत काय केले असते.

मदर टेरेसाच्या या विंनतीच्या उत्तरात डिस्ट्रिक्ट ॲटर्नी टर्लेने मदर टेरेसास लिहिले की हाच प्रतिप्रश्न मी तुम्हास विचारतो. तुम्ही स्वतःलाच विचारा की जर अपराधाद्वारे अर्जित धन येशूस दिले असते तर त्याने काय केले असते? त्यांने अवश्यच ते धन त्यांना परत केले असते ज्यांचे ते होते. इतरांचे धन जे कीटिंगने तुम्हांपर्यंत पोहचविले ते तुम्ही स्वतःजवळच ठेवू नका. ते त्या लोकांना परत द्या, ज्यांचे ते धन चोरले गेले आहे. मदर टेरेसाने त्यांच्या या विंनतीचा स्वीकार केला नाही आणि ना त्यास कसले उत्तर दिले.

ISBN 81-85990-52-2, p 140

*ती सगळा पैसा गिळून बसली. ढेकरसुद्धा दिला नाही. आता प्रश्न पडतो की बेईमानीची कमाई असलेली ती रक्कम कोलकत्त्यांच्या गरिबांवर खर्च करण्यात आली काय? याचे उत्तर तुम्हांस आश्चर्य कारक वाटेल.*

> क्रिस्टोफर हिचेन्स आपल्या प्रसिद्ध पुस्तक *'द मिशनरी पोजीशन'* मध्ये लिहितात की (1) मदर टेरेसांचे रूग्णालय पाहण्यासाठी जेव्हाजेव्हा परदेशी डॉक्टर आले तेव्हातेव्हा त्या सर्वांनी तेथील चिकित्सापद्धत अत्यंत अनुपयुक्त म्हटले विशेषकरून हे लक्षात घेत की इतका प्रचंड पैसा जो दानाच्या रूपात याच लोकांच्या सेवेसाठी त्यांच्याकडे येतो. (2) तर त्याच धनाचा स्वतःसाठी पूर्ण उपयोग करीत मदर टेरेसा सर्वदा विश्वस्तरावरील चिकित्सेचा उपभोग घेत राहिल्या. हिचेन्स चे मानणे असे की मदर टेरेसांची रूची गरिबाना वैद्यकीय सेवा देण्यात नव्हे उलटपक्षी (1) लोकांचे ईसाई धर्मांतर तसेच (2) स्वतःसाठी संतपदवी प्राप्तीत होती.

Christopher Hitchens, The Missionary Position Mother Teresa in Theory and Practice, Verso, London, New York, editorial review at www.amazon.com

## यांची करणी तर राईची मात्र बतावणी पर्वताची

> त्यांचया "मरणासन्न लोकांच्या घरात" (होम फॉर द डाइंग) मध्ये कसल्याही प्रकारच्या औषधांची व्यवस्था नव्हती. येथपर्यंत की मृत्युपंथास लागलेल्या लोकांना साधीसाधी औषधे सुद्धा दिली जात नसत. ज्यायोगे त्यांचे दुःख कमी होऊ शकेल. त्यांच्या शिशूंच्या पालणाघरामध्ये ना कसली खेळणी असत, ना खेळण्यासाठी जागा. त्यांना केवळ ऐकविले जात असत की प्रार्थना करा.

ISBN 81-85990-52-2, p 138

विचार करण्याजोगी गोष्ट ही की कोणाची प्रार्थना करण्यास सांगितले जात असावे? येशूशिवाय कोणासही ही दया व सेवची मूर्ती जाणतच नव्हती. हया प्रार्थनेच्या बहाण्याने ही आपली देवी टेरेसा अजाण बालकांना मोठया सहजपणे व चालाखीने ईसाई करून टाकत असे. *ही बालके ज्यांना दोन धर्मातील अंतराचे मुळी भानच असू शकत नाही, त्यांना कल्पना दिल्याविना अशा चालाखीने ईसाई करून टाकण्यात येत असे. याच उद्देशाने ती बालकांना रस्त्यातून उचलून आणित असावी काय?*

अखिल विश्वातील श्वेतवर्णी लोक म्हणत असत की भुकेने व्याकुळ, रोगांनी पछाडलेल्या गरिबांचा उद्धार करणारी एकच संत भारतवर्षात आहे. *हीच प्रतिमा घेऊन आपली ही जीवनदायीनी मदर टेरेसा सर्वत्र संचार करत असे विश्वभरात दान मागण्यासाठी. आणि म्हणत असे की भारतवर्षात जर कोणाची खरी गरज असेल तर ती ईसा मसिहाची - प्रभू येशूची.* याच गोष्टीवर टीका करत ईश्वर शरण (स्वामी देवानंद सरस्वती) लिहितात -

> कम्युनिस्ट बनण्यापूर्वीचा यूगोस्लाविया, उत्तर आयरलँड, दक्षिण आफ्रिका, रवांडा, ब्राझील, फिलीपाईन, या सर्वांजवळ ईसा आहे आणि तो दीर्घकाळ आहे. पण असे दिसत तर नाही की यामुळे त्यांचे काही भले झाले, ना नैतिक दृष्टीने, ना आध्यात्मिक दृष्टीने, ना भौतिक दृष्टीने.

ISBN 81-85990-21-2, p 122n

ही झाली गोष्ट त्यांच्या अस्सल धंद्याची अर्थात सेवा शुश्रूषेचा मुखवटा चढवून हिंदूचे धर्मपरिवर्तन करण्याची. मुसलमानांचे धर्मपरिवर्तन करण्याची हिम्मत तर त्यांच्यात नव्हतीच व नाहीही कारण ते जाणत होते व आताही जाणतात की त्यांचे तिकीट भारतवर्षातूनच नाही तर या जगातूनही काटले जाईल. वस्तुःत काही लोक अशीच भाषा समजतात. हिंदू धर्म अशी भाषा शिकवीत नाही आणि ते उचितही आहे. परंतु अशा नितिभ्रष्ट लोकांना डोक्यावरही न घेतले पाहिजे. परंतु सामान्य हिंदूनी करावे तरी काय? त्यास सत्यापासून अनभिज्ञ व दूर ठेवले गेले आहे. म्हणून हिंदूंना दोष देऊन आपल्या योग्यतेचा परिचय देणा-यास लाज वाटली पाहिजे. मग त्यांनी असा विचार केला पाहिजे की त्या सर्वांना काय केले पाहिजे ज्यांनी अशा धोकेबाजांना जनसामान्यांच्या नजरेत महा बनिवले. समस्या तर अशी आहे की हे सर्व ज्ञानीजन जे हिंदूमध्ये सर्व खोट काढीत असतात. ते सर्वच कःपुरूष आहेत. त्यांच्याठायी वास्तविक अपराध्यांकडे बोट दाखविण्याची क्षमता तर नाहीच मुळी.

*असो, आता पाहू आणखी एक उदाहारण धनलोलुपतेच्या पराकाष्ठेचे -*

> एक छोटासा देश आहे हायती - एक अत्यंत गरीब देश. त्याचा कुख्यात बादशाहा आहे डुवालीयार, आणि त्याची पत्नी आहे मिशेल. त्या दोघांनी आपल्या देशातून हडप केले अब्जावधी डॉलर आणि तेथून पलायन करून ते उभयता स्पेनमध्ये जाऊन बसले. या राजाने फार मोठया प्रमाणावर प्रजेची हत्या केली होती. तरीही मदर टेरेसाने त्यांच्याकडून कोट्यवधी रू. घेतले आणि रक्ताने बरबटलेल्या त्याच्या हाताने आपल्या सन्मानार्थ पदकही घेतले. या सर्वाच्या मोबदल्यापोटी मदर टेरेसानी डुविलायरसाठी राजनैतिक प्रचारार्थ एक फिल्म तयार करण्यास त्यास खास मदत केली. या घटनेचे विवरण देत श्री राजाराम विचारतात की या ईसाई धर्मदूतांमध्ये मदर टेरेसापासून ते पॅट रॉबर्टसनपर्यंत असे काय आहे जे त्यांना वारंवार चोरां आणि डुवालियार सारख्या जनसमूहांच्या हत्त्यांकडे आकर्षित करते?

ISBN 81-85990-52-2, pp 140-141

वेश्या आपल्या देहाचा विक्रय करत असतात. त्यापैकी अनेकजणी हे स्वेच्छेने करत नसतात तर त्या एकतर नाईलजाने करतात नाहीतर असे करण्यास त्त्यांना बाध्य केले जाते. दया व प्रेम याची देवी मदर टेरेसा आपली अनुचित ख्याती विकतात, चोरांना आणि खुन्यांना, पण नाईलाज म्हणून नव्हे तर धन लोलुपतेमुळे. पोपांनी असे केले, ईसाई संतानी असे केले, ईसाई धर्मगुरूंनी असे केले. मग त्यांचे अनुयायी साधारण ईसाई संधी प्राप्त होताच काय करणार नाहीत? जेव्हा संधी मिळते तेव्हा करून टाकतात असे काही परंतु वरून तर जंटलमन सद्‌गृहस्थ दिसतात. त्यांच्या या दिखाऊ सज्जनतेच्या धोक्यात ना राहिले पाहिजे. नाहीतर फार पस्तावाल. हे लोक करतात राईऐवढे आणि देखावा करतात पर्वताएवढा. या हेतूने ते प्रसारमाध्यमांचा आसरा घेतात. पण प्रसार माध्यमांचे चरित्र कसे असते? जसे एका वेश्येचे. वेश्या आपले शरीर विकतात आणि प्रसार माध्यमे आपल्या शरीराचे भाग विकतात. जर माध्यम एखादे समाचारपत्र असेल तर त्याच्या कागदाची (शरीराची) जी रिकामी जाग असते ती विकते. जर ते एखादे टी व्ही चॅनेल असेल तर ते आपल्या फावल्यावेळेस (शरीर) विकते. यांना धनाची अत्यंत आवश्यकता असते. धनाद्वारे ते विकत घेतात व विकले जाऊ शकतात. *त्यांच्या समाचार प्रकाशनाच्या व प्रसारणाच्या नीती*

*विकल्या व विकत घेतल्या जातात*. हे सत्य आहे अनेक इंग्रजी समाचार पत्रांबाबत आणि त्यांच्या अनेक भारतीय भाषांतील अन्य आवृत्त्यांबाबत. काही असेही आहेत जे या परिधात येत नाहीत पण ते अल्पसंख्यक आहेत. आणि त्यांचा प्रभाव जनतेवर मर्यादित स्वरूपाचा असतो.

*ईसाई धर्माचे प्रचारक व प्रसारक माध्यमांचे हे चरित्र फार चांगल्या प्रकारे समजतात. कारण त्यात त्यांना आपल्या चरित्राचे प्रतिबिंब अगदी ठळकपणे दिसते. ते या माहितीचा पुरेपुर उपयोग (दुरूपयोग म्हणणे अधिक चांगले) करून घेतात. साधारण जनता ही गोष्ट ना जाणते ना समजते. जनतेस वाटते की प्रत्येक पत्र जर एखादी गोष्ट छापत असेल तर ती सत्यच असते.*

*ईसाई धर्माच्या प्रचारासाठी व प्रसारासाठी जे धन प्राप्त होते ते अधिकांश अपवित्रच असते. त्याच अपवित्रतेचा प्रयोग करण्याने अधिकच अपवित्रतता पसरत जाते. अपवित्रतता अपवित्रतेत मिसळून जाते आणि एकरंगाची होते. अपवित्रता घाण पसरविण्यासाठी हे आवश्यक बनते की स्वच्छतेचे निर्मूलन केले जावे. स्वच्छता पूर्णपणे उखडून टाकणे हे घाण पसरविण्याससाठी अत्यंत आवश्यक असते. परिणामी घाण स्वच्छतेशी अशी एकरूप होऊन जाते की स्वच्छतेस स्वतःची लाज वाटू लागते, की ती घाणच झाली आहे. अशाप्रकारे स्वच्छता आपली ओळख हरवून बसते. हीच कहाणी आहे हिंदूधर्माची जिचे ईसाईकरण झाले आहे.*

चला आता आपण थोडे विषयांतर करू या. इंग्लंडमध्ये स्थायी झालेले डॉ. आरूप चॅटर्जी आपल्या ख्यातिप्राप्त पुस्तक *'द फायनल वर्डिक्ट'* च्या प्रस्तावनेत लिहितात की -

> मी जन्मलो, पुष्ट झालो आणि मोठा झालो कोलकत्यात. जेथपर्यंत आम्हांस आमच्या पूर्वजांच्या संबंधी माहिती आहे. आमचा परीवार नेहमीसाठी येथेच राहिला. मी कोलकता चांगल्याप्रकारे जाणतो. आणि असे अनेक लोकही जाणतो ज्यांना ज्यांना तेथे महत्त्व आहे. आणि त्यापेक्षा अधिक लोक असे जाणतो की ज्यांना महत्त्व नाही. आज मी जो काही आणि जसा काही घडलो आहे तो कोलकत्त्यामुळेच. माझी मातृभाषा बांग्ला (बंगाली) आहे, जी कोलकत्त्याची लोकभाषा आहे. कामापुरते हिंदीही बोलतो. कोलकत्त्यात अनेक हीनदीन व्यक्तींद्वारे हिंदी भाषा बोलली जाते. इंग्लंडला येण्यापूर्वी मदर टेरेसांमध्ये मला कसलीही रूची नव्हती. येथील पश्चिम वासियांना मग कितीही अवघड वाटो, हे जाणून की, मदर टेरेसा आपल्या आयुष्यात कोणी महत्त्वपूर्ण व्यक्ती नव्हती. पण हा एक विचित्र विरोधाभास आहे की मृत्यूनंतर त्यांची प्रतिमा महत्त्वपूर्ण उच्चतेस स्पर्श करू लागली आहे. याचे प्राथमिक कारण आहे अशी भारतीय भावना जी पश्चिमतेचे मोठया उत्साहाने अनुकरण करते, अनेक महत्तवहीन विषयांमध्ये. माझ्या कॉलेजच्या काळात कोलकत्त्याच्या हीनदीनांमध्ये मला काहीशी रूची होती, जेव्हा मी वामपंथी राजनीतीत वरवर रस घेत असे. मानवाधिकारासंबंधीच्या विषयांतही मी खोल रूची घेतली होती. कोलकत्त्याच्या गरीब लोकांत मिळण्या - मिसळण्याच्यावेळी माझी पाऊले मदर टेरेसाच्या संस्थेकडे कधी वळली नाहीत. वास्तविक मला आठवत ही नाही की कोणी कधी मदर टेरेसांचे नाव घेतलेही असेल.

Aroup Chatterjee, The Final Verdict, www.meteorbooks.com

*मी याचा उल्लेख का केला हे तुम्हांस समजले का? विचार करून पहा. विचार करून पहा एक माणूस जो कोलकत्त्यात वाढला व पोसला गेला व अत्यंत गरीब व्यक्तीच्या संपर्कात राहिला,*

*त्याने कधीही कोणासही मदर टेरेसाचे नाव उच्चारताना ऐकले नाही. ना मदर टेरेसाच्या संस्थेस त्यांच्या साहायार्थ पुढे येताना पाहिले. जर मदर टेरेसानी कोलकत्त्याच्या गरिंबासाठी काही केले असते, जे खरोखर महत्त्वपूर्ण असते, तर हे शक्य झाले असते काय?*

*मायावी व्यक्तित्वाचे वैशिष्ट्य असे असते की जे दिसते ते सत्य नसते. तसेच जे दिसत नाही तेच दडलेले सत्य असते. हा गुण विशेषकरून आसुरी प्रवृत्तीच्या व्यक्तींमध्ये आढळतो, हे तर आपण जाणतच असाल, जर आपण रामायण महाभारतात आदी वाचले असेल व समजून घेतले असतील. मेघनादास मायावी विद्या अवगत होती. युद्धप्रसंगी तो जेथे असे तेथे तो श्रीरामांना दिसत नसे, आणि जेथे दिसत असे तेथे तो वास्तवात नसे. मायेचा आश्रय करून रावण सीतेजवळ आला, तेव्हा त्या सीतेस जो साधू दिसला तो, वास्तवात रावण होता. तो तिला रावण दिसत नव्हता. मारीच सोन्याचे हरीण आसल्यासारखा दिसला जो तो नव्हता. आणि तो जो वास्तवात होता तो दिसला नाही. याचप्रकारे महाभारतात मायासुराने पांडवासाठी इंद्रप्रस्थ नगरीत जो राजवाडा बनविला तेथील भूमी म्हणजे वाहते पाणी आणि वाहते पाणी भूमी समजून दुर्योधन आपटला म्हणून दौपदी म्हणाली 'आंधळयाचा पुत्र आंधळाच'. तेथेच पाया रचला गेला शकुनीच्या सारीपाटाच्या डावाचा. द्रौपदीच्या वस्त्रहरणाचा आणि भावी महाभारताच्या युद्धाचा.*

*असो पुढे जाऊया. लैसेंट जगातील एक अग्रणी वैद्यकीय पत्र (मेडीकल जर्नल) आहे. त्याचे संपादक डॉ. रॉबिन कॉक्सने लिहिले आहे -*

'मदर टेरेसाची रूग्णालये अत्यंत अस्वास्थ्यकर आहेत.

as quoted in ISBN 81-85990-52-2, pp 138-139

त्यातील काही चुणूक पाहू या -

मेरी ल्यूडननामक एका इंग्रजी निरीक्षकेस आढळले की सर्वच रोगी जमिनीवर झोपले आहेत. एका खोलीत साठ रोगी. (इंजेक्शनच्या) संक्रमित सुयांचा वापर केला जात होता. केवळ साध्या पाण्याने धुऊन. जेथे रूग्णांना छोट्याश्या शस्त्रक्रियेची गरज असे तेथे रोग्यांना कोलकत्त्याच्या अन्य रूग्णालयात न पाठवता आहे तेथेच मरू दिले जात होते. ही स्थिती केवळ रूग्णांचीच नव्हे तर रूग्णांना सेवा देणा-याना संक्रमणापासून दूर ठेवण्याचे कसलेही प्रयत्न केले जात नव्हते.

ऐन सेब्बाने असेही नमूद केले की कित्येक परिचारिकांना क्षय तसेच संभवत एडस झाला होता. या सर्व स्थितीत एकच उपचार सांगितला जात असे मग रूग्णांची स्थिती कशीही असो - प्रार्थना. यायोगे टेरेसाच्या येशूप्रत श्रद्धाळू स्त्री अशा प्रतिमेत मोठी वाढ झाली. यायोगे तिच्या धनसंचयात मोठी वाढ झाली कारण प्रार्थनेस कसला खर्च येत नसतो.

परंतु टेरेसा मात्र स्वतःच्या स्वास्थ्याबद्दल फार सावध असे. जेव्हा जेव्हा त्यांना चिकित्सेची आवश्यकता असे तेव्हा त्या बोस्टनच्या मॅसाच्यूसेटस सारख्या विश्वविख्यात सर्वोत्कृष्ट रूग्णालयात आपली शुश्रूषा करवीत. आपल्या शेवटच्या आजारात जेव्हा अमेरिकेच्या प्रवासास योग्य नव्हत्या, तेव्हा त्या गेल्या कोलकत्त्याच्या प्रतिष्ठित आर. के. बिरला हार्ट रिचर्स सेंटरमध्ये, जी एक हिंदू परोपकारी संस्था आहे. यात ना येशू आडवा आला न

पैसा. परंतु जेव्हा त्यांच्या रूग्णालयातील एखादा गरीब अत्यवस्थ असे तेव्हा त्याच्या खर्चासाठी ना पैसा ना हिंदू रूग्णालय. त्याला मिळे केवळ प्रार्थना येशूची.

अशी विस्मयजनक स्थिती पाहता तुम्हांस वाटेल की त्या असे करण्यामागे त्यांची सामान्य स्थिती असेल. पण तुम्हांस आश्चर्य वाटेल जेव्हा तुम्हांस कळेल की टेरेसांच्या मृत्यूनंतर ब्रॉन्क्स मधील एका बँकेत त्यांच्या खात्यात पन्नास मिलीयन डॉलर्स (2 अब्ज 15 कोटी रूपये) जमा असल्याचे आढळले.

ISBN 81-85990-52-2, pp 138-139

*यापैकी एक कवडीही कोलकत्त्याच्या गरीबांसाठी खर्च केली गेली नाही. जरी हे ढिगाराभर धन आले होते कोलकत्त्याच्या त्याच गरिबांच्या चिकित्सेसाठी दानस्वरूपात. त्यांनी हे धन भारतीय बँकांत ठेवले नव्हते. कारण तसे केल्याने पितळ उघडे पडले असते. या उत्पन्नावर त्यांनी भारत सरकारचा करही भरला नव्हता. परोपकाराच्या नावावर जमा करीत गेल्या विदेशात सर्वांच्या नजरा चुकवून.*

*आम्हांस आतापर्यंत एकाच बँकेतील एकाच खात्याची माहिती मिळाली आहे. आम्ही जाणत नाही अजून किती बँकांत अशी किती छुपी खाती आहेत. कुठेकुठे विखरून ठेवली आहेत मदर टेरेसांनी. तुम्ही काही मोजक्याच नेत्यांना का शिव्या देता? त्यांना मार्ग दाखविणारे हे ईसाई संतच आहेत. ज्यांच्या शिकवणीमुळेच हे मोठे झाले आहेत.*

*मृत्यूनंतर मदर टेरेसाची पत्रे तसेच त्यांच्या व्यक्तिगत रोजनिशा समोर आल्या. मदर टेरेसांनी लिहिले की -*

*माझे स्मित केवळ एक मोठे बुजगावणे आहे. मला जाणवते की ईश्वरांस मी आवडत नाही. मला भासते की ईश्वराचे अस्तितवच नाही.*

विवरण - (1) The Daily Telegraph (2) IL Messeggero (3) PTI London 29 Nov reported in Indian Express, Mumbai edition 30 Nov 2002

*हे वाचून तुम्हांस आश्चर्य वाटले काय? आश्चर्य वाटू देऊ नका. मरण्यापूर्वी त्या खोटया बोलल्या नाहीत. अनेकांशी असे होते जे आयुष्यभर दुस-यांना गोंधळात टाकतात, छळ करीत असतात. मरण्यापूर्वी आपल्या व्यक्तिगत रोजनिशांत त्या खरे बोलून गेल्या. त्यांनी लिहिले की त्यांचे ते स्मित हास्य एक बुजगावणे होते. त्यांनी याचाही स्वीकार केला की त्यांना याची अनुभूती आली की त्या ईश्वरास आवडत नाहीत. विचार करा - त्या मदर टेरेसा ज्या गरिबांना व तडफणा-यांना धोका देउन आपले नाव व पैसा ज्यांनी कमविला, त्या ईश्वरास प्रिय कशा असू शकतील?*

*मदर टेरेसांनी लिहिले की मला वाटते ईश्वर, ईश्वरच नाही. मरण्यापूर्वी अजून एक गोष्ट त्यांनी जाणली. ईसाई धर्माच्या गॉडची प्रतिमा तर तुम्ही पाहिली असेलच, आपल्या हया पुस्तकाच्या आरंभी, जेथे आम्ही पोपविषयी बोलत होतो. तुम्हांस पटते काय की ईश्वर असा असू शकतो. एका कसाया सारखा? ज्या ईश्वरांस टेरेसानी आयुष्यभर गॉड म्हणून जाणले, तो ईश्वर असूच शकत नाही. ही गोष्टही त्यांनी पुढे जाऊन जाणली. स्वाभाविक आहे की त्यांना जाणवले की ईश्वर ईश्वरच नव्हे. अर्थात त्यांनी जाणले की ईसायांचा तो गॉड ईश्वरच नव्हे.*

*अशा ईश्वराचे अस्तित्व असूच शकत नाही ज्याच्या चरित्राचे वर्णन बायबलमध्ये आहे. टेरेसांनी आयुष्यभर त्यासच ईवर मानले व जाणले. स्वाभाविक आहे की पुढे जाऊन त्यांना हया गोष्टीची अनुभूती झाली की असे कसायासारखे ईश्वराचे अस्तित्व असूच शकत नाही.*

*आयुष्यभर टेरेसांनी येशूच्या नावाची माळ जपली. मरण्यापूर्वी त्यांना हया गोष्टीची अनुभूती आली की तो येशू, ज्याने अगदी स्पष्ट शब्दांत आपल्या शिष्यांना असे सांगितले की तो या जगात शांती आणि प्रेम* ***घेउन*** *आला नसून तलवार, युद्ध आणि आग ओकण्याचा संदेश घेऊन आला आहे. त्याच येशूने शब्दांची तोडफोड न करता फारच स्पष्ट शब्दात आपल्या मुख्य शिष्यांना असे सांगितले की तो या जगात फूट पाडण्यासाठी, पुत्रास बापाविरूद्ध, मुलीस आईविरूद्ध, सुनेस सासूविरूद्ध उभे करण्यासाठी. मदर टेरेसांना अशीही जाणीव झाली मरणापूर्वी की येशूने वास्तवात आपले म्हणणे खरे करून दाखविले आहे, मागील दोनहजार वर्षात. टेरेसा पळत राहिल्या, पळत राहिल्या, त्या मृगतृष्णेमागे जिला येशू तसेच गॉड नावाने जाणले.*

मरणापूर्वी त्यांनी हेही जाणले की दोघेही तेवढेच मोठे बुजगावणे आहेत. जेवढया त्या स्वतः होत्या. म्हणून मरणापूर्वी आपल्या रोजनिशीत त्यांनी कबूल केले की त्या गॉडचे अस्तित्वच नाही. आणि त्याच गॉडबरोबर येशूचे अस्तित्वही समाप्त होते. कारण येशूचा असा दावा होता की तो त्या गॉडचा एकमात्र पुत्र आहे. जेव्हामदर टेरेसाच्या मते बापाचेच अस्तित्व नाही तर मग पुत्र कसा असणार बापाविना?

*या तर केवळ चुणूका आहेत ज्या तुम्हांस जाणीव करून देतात की अथपासून इतिपर्यंत सर्व बुजगावणीच बुजगावणी आहेत. जेव्हा मी माझ्या इंग्रजी भाषेतील मोठमोठया ग्रंथाचा* ***मराठीतून*** *अनुवाद करीन तेव्हा तुम्हांस एवढी माहिती मिळेल की तुमच्या मनात तिळमात्रही शंका उरणार नाही की ईसाई धर्माचा पाया केवढा मोठा धोका आणि दगलबाजीवर उभा आहे आणि त्यांनी हिंदूधर्माचा मागमूस मिटवून टाकण्यासाठी कायकाय प्रपंच केले आणि जेव्हा पूर्ण साफल्य मिळाले नाही, तेव्हा हिंदूधर्माच्या तोंडावर काळे फासण्यासाठी कसलीकसली षड्यंत्रे रचली. मग मी तुम्हांपुढे असा प्रश्न ठेवीन की तुम्ही स्वतः विचार करा की तुम्ही हया नराधमांशी कसा व्यवहार केला पाहिजे.*

# मानवतेच्या सेवेचा आणखी एक ईसाई घृणित चेहरा

*1823 च्या इसवीसनाची ही गोष्ट आहे, सुमारे एकशेपंचाऐंशी वर्षापूर्वीची. ईसाई-इंग्रजांनी भारताच्या रक्ताचा थेंबनाथेंब शोषून घेतला होता. भारतभूमी जे काही उगवत होती त्याचा अधिकतर भाग ईसाई-इंग्रज कर रूपाने वसूल करत राहिले, वर्षानुवर्षे, इथपर्यंत की शेतकरी भाकरीसाठीही महाग झाला. ज्यांना स्वतःच्या पोटासाठी अन्न राहिले नाही असा शेतकरी धरतीमातेस काय देऊ शकणार? भूमी नापीक होत गेली. आकाश कोरडे पडत गेले. ज्या शेतक-यास पिण्यास पाणी नव्हते, ते बिचारे आपल्या धरतीमातेस काय देणार? दोन घास अन्न ज्यांच्याजवळ नव्हते ते खत रूपाने भूमीस काय देणार?*

*सुजलाम सुफलाम शस्य श्यामलाम राहिली ना बंगालची धरती ना उडिसाची. भीषण दुष्काळ पडला. पाँडेचरीच्या (ईसाई) महाधर्माध्यक्षांनी यूरोपच्या आपल्या वरिष्ठ अधिका-यांना लिहिले, जे ईसाई "भारतवर्ष एवं उसके मिशन" मध्ये प्रकाशित झाले. त्या प्रकाशनात एक अध्याय होता, ज्याचे शीर्षक होते "अकाल और हैजे के आध्यात्मिक लाभ", अर्थात दुष्काळ आणि कॉलरा चे आध्यात्मिक लाभ". लक्षात घ्या भारतात पडलेल्या दुष्काळ आणि त्याच काळात पसरलेल्या पटकी सारख्या महाभयंकर रोगाचा जो लाभ ईसाई मिशनला झाला त्याचा वृत्तांत यात होता आणि अशा संकटास त्यांनी आध्यात्मिक लाभ नावाने प्रस्तुत केले.*

*ईसाई महाधर्माध्यक्षांनी लिहीले की -*

> दुष्काळाने तर चमत्कारच केला. भुकेने तडफडणारी लहानलहान बालके आपल्या पायांनी चालत येत आहेत ठोक भावाने या स्वर्गाकडे. आमचे हे रूग्णालय बनले आहे (ईसाच्या भावी अनुयांयासाठी) एक संचय स्थळ. आम्ही जाऊन बळेच त्यांना इकडे आणावे लागत नाहीत. तेच एक दुस-यास पाठवतात.

Archbishop of Pondicherry wrote to his superiors in Europe, in a Catholic publication "India and its Missions" brought out in 1823, chapter "Spiriutal Advantages of Famine and Cholera" quoted in Missionaries in India, Arun Shourie, New Delhi 1994, p 16 reproduced in ISBN 81-85990-54-9, p 75

*चेह-यावर पडदा जेण्टलमनचा आणि विचारसरणी हैवानाची. लोक मरू लागले आहेत आणि हे ईसाई धर्माध्यक्ष त्याचा उत्सव साजरा करीत आहेत. यांना धर्मांतराचे प्रयत्न करावे लागत नाहीत. भुकेने व्याकुळ बालके आपल्या पायांनी चालत येत आहेत दोन घास अन्नासाठी. ही बनते एक संधी त्या शरीर आणि आत्म्याच्या खरेदीदारांसाठी.*

*ईसाई धर्म उगवला कोठेही असो परंतु ते सर्व आहेत एकाच माळेचे मणी. उदाहरणच घ्यायावयाचे असेल तर पहिले पोप होते ईटलीचे. संत फ्रान्सीस जेवियर होते स्पेनचे. पादरी हेनरी तिसरे होते इंग्लंडचे. मदर टेरेसा होत्या अलबानिया (आता मेसेडोनिया), पाँडेचरीचे महाधर्माध्यक्ष होते बहुतेककरून फ्रान्सचे कारण पाँडेचरी त्यावेळी फ्रान्सच्या अधीन होती. भारतवर्षाच्या आणि अन्य देशांच्या या महानुभावांविषयी पुढे चर्चा करू या.*

*आता दोनशे वर्षानंतरची इ.स. 2005 ची घटना ऐका सुनामीच्या काळातील -*

> वर्ल्डहेल्प अर्थात विश्वसाहायकनामक एक अमेरिकन संस्था इंटरनेटवर लोकांना धनाच्या दानाची मागणी करीत होती या आश्वासनासह की या दानातून ती तीनशे अनाथ बालकांचे पालन करून त्यांना वाढवील ईसाई शाळांमधून. आरंभ तर तिने उत्साहाने केला होता. पण यास तिने अंधारातच सोडले. कारण या विश्वसहायकांना समजले की ते त्या बालकांना ईसाई करू शकणार नाहीत. इंडोनेशियाच्या सरकारच्या एका प्रतिबंधामुळे.

विवरण - The Times of India, Mumbai Edition, 19 January 2005, p 13

*जर तुम्ही मनापासून एखाद्यास साहाय करू इच्छित असाल तर अनेक मार्ग आहेत. जर साहायकरणे हा तुमचा व्यवसाय असेल तर गोष्ट वेगळी. ईसाई व्हाल तर आम्ही तुम्हास साहाय करण्यास तयार आहोत. ही विचार सरणी आहे ईसायांची. पण ते बहुधा जाहीर होऊ देऊ इच्छित*

*नाहीत. ही दडवून ठेवण्यासाठी ते मोठमोठया गोष्टी करतात. जर आव्हान द्याल तर तुम्ही हे स्वतःच जाणाल की त्यांच्या वाणी आणि करणी मध्ये केवढे अंतर आहे.*

इ.स. 2004 मध्ये येशूचा जन्मदिन क्रिसमसच्यावेळी जेव्हा सुनामी आल्या तेव्हा लोक बेघर झाले. त्यांच्याजवळ काहीही उरले नव्हते. तेव्हा त्यांना गरज होती अन्नाची, कपडयांची आणि डोईवर छपराची. पण सेवेच्या भावाने प्रेरित झालेली इंटरनॅशनल बायबल सोसायटी त्या समयी थायलंडच्या थाई भाषेत एक लाख प्रती वाटत होती.

विवरण - The Times of India, Mumbai edition 19th January 2005, p 13

*त्याना वाटत असेल की बायबलच्या पुस्तकाने सुनामी पीडितांचे पोटही भरेल. शरीर झाकण्यास वस्त्रही मिळेल आणि छप्परही मिळेल. माणसावर आलेले संकट त्यांना एका संधीच्या रूपात दिसते - धर्मपरिवर्तनासाठी.*

*पुढच्याच महिन्यात अभिनेत्री परवीन बॉबीचे जेव्हा निधन झाले, तेव्हा तिच्या शेजा-यांनी सांगितले की ती ना कधी घराबाहेर पडत असे ना कधी कोणाला आपल्या घरी बोलवीत असे. येथपर्यंत की त्यांचे प्रेत दोन दिवस घरातच सडत राहिले आणि कोणाच्या कानी हे वृत्त पडले नाही. वृत्तपत्रांच्या वृत्तामध्ये असे छापले गेले की परवीन बॉबीचा कोणी उत्तराधिकारी नाही जो तिच्या विशाल संपत्तीचा वारसा बनू शकतो. तेव्हा दुस-याच दिवशी वेळ न दवडता तीन पादरी पांढरा झगा आणि काळी पटटी बांधून तेथे पोहचले. या दाव्यासही की मृत्यूपूर्वी परवीनने त्यांना फोन करून कळवले की त्यांचा अंतिमविधी ईसाई धर्मानुसार व्हावा. अशी त्यांची इच्छा होती.*

विवरण - The Times of India, Mumbai edition p 1 & 2

*त्या मेल्या त्यांचे प्रेत दोन दिवस घरात सडत पडले तेव्हा ते पादरी कदाचित दुस-यांना ईसाई बनविण्यात मग्न असतील. समाचार मिळाला की फार मोठी संपत्ती बेवारस पडली आहे तेव्हा भुकेल्या लांडग्याप्रमाणे तेही त्यावर झेपावले. परंतु त्यांच्यासाठी हे सिद्ध करणे अवघड होते की परवीन बॉबीचे ते दूरचे नातेवाईक होते. म्हणून त्यांनी हा अपरिचित मार्ग निवडला. यायोगे अंतिम संस्कारानंतर परवीनच्या बेवारस संपत्तीवर हक्क सांगण्यासाठी एक बहाणा चर्चला मिळू शकला. गंमतीच्या गोष्टी अशा की त्यांच्याजवळ असे कोणतेही प्रमाण नव्हते की ज्यावरून परवीन कधी ईसाई बनल्याचे सिद्ध होईल. हे वाचून मला अचानक श्री रामकृष्ण परमहंसानी सांगितलेली एक गोष्ट आठवली. घार जेव्हा आकाशात भरारी मारते तेव्हा तिची नजर नेहमी जमिनीवर असते, की कोठे एखादा मेलेला उंदीर दिसतो व मी लगेच झपाटा मारीन. काही साम्य दिसले?*

# असा दावा होता पोपाचा

चर्च ही गोष्ट स्पष्ट करू इच्छिते की येशू एकमात्र मध्यस्थ आहेत गॉड आणि मानव यांच्यामध्ये. तसेच ती एकच व्यक्ती आहे जी मानवतेस मोक्ष दाखवू शकते.

Pope John Paul ll, The Coming of the Third Millennium, quoted in ISBN 81-85990-60-3 p 147

*पोप जॉन पॉल द्वितीय यांनी या भारतभूमीत येऊन दावा केला होता की गॉड आणि मानव यांच्यामध्ये एकच मध्यस्थ आहे, येशू, आणि त्यांच्याविना मानवास कधी मोक्ष मिळू शकत नाही.*

*ईसाई गॉडचा एकमात्र पुत्र असल्याचा दावा करणा-या येशूनेही एक दावा केला होता की जो कोणी ईसाई बनणार नाही तो अनंत काळापर्यंत नरकात सडत राहील.*

*असा येशू आणि पोपचा गॉड हिंदूसाठी ईश्वर असूच शकत नाही. आमचा ईश्वर तर म्हणतो की प्रत्येक जण मजपर्यंत पोहचू शकतो कोणत्याही मध्यस्थाविना अर्थात कोणत्याही दलालाविना जर त्याच्याठायी मजप्रत गाढ निष्ठा आणि ओढ असेल तर.*

*तर मग कोणत्या आधारावर आपले नामधारी ग्रामस्थ हिंदू धर्मगुरू म्हणतात की ईसायांचा गॉड आणि हिंदूंचा ईश्वर एकच आहे. असे वाटते की ते हिंदूंचा ईश्वर थोडाबहुत जाणतात पण ईसाई धर्माच्या गॉडची त्यांना थोडीही ओळख नाही. आपल्या भक्तांना मार्ग दाखविण्यापूर्वी या धर्मगुरूंनी आपआपल्या माहितीत सुधारणा करावी लागेल. अन्यथा ते अशा पापाचे भागी बनतील, ज्याची त्यांनी कल्पनाही केली नसेल.*

*आता वळू या पोपच्या त्या दाव्याकडे. ईश्वर तसेच मानव यांच्यामधील एकमात्र मध्यस्थ आहे येशू. आणि त्यांच्या विना मानवास मोक्ष मिळत नाही. हे वाचल्यावर माझ्या मनास काही प्रश्न पडले*

*येशूचा जन्म होउन केवळ दोन हजार वर्षे झाली. जर मानव आणि ईश्वर यांच्यात इतर कोणी मध्यस्थी करू शकत नाही केवळ येशूव्यतिरिक्त तर येशूपूर्वी जन्मलेले सर्वच मानव अद्यापही नरकात सडत पडले असावेत? येशूच्या त्या काल्पनिक नरकात ऐवढी जागा तरी आहे का? का येशूच्या गॉडच्या नरकात जागेची चणचण निर्माण झाली? आणि म्हणूनच त्या गॉडने येशूस पाठविले ह्या धरतीवर, असे म्हणून की जा माझ्या एकमात्र पुत्रा - जा त्या धरतीवर जेथून मागील लक्षावधी वर्षांमध्ये जन्मलेल्या मानवांनी माझ्या ह्या नरकात थोडीही जागा ठेवली नाही. जेथे मी आजच्या मानवांना आणून सडवू शकेन. या कारणाने मी तुला, मी केवळ तुलाच माझा एकमात्र दलाल म्हणून नियुक्त करीत आहे. जा लोकांना धडाधड ईसाई करून टाक. ज्यायोगे त्यांना मी त्या स्वर्गात जागा देऊ शकेन, जे लाखोवर्षापासून रिकामे पडून आहेत. एक मी येथे एकटा पडून बोअर होत आहे. शेवटी मलाही कोणी सोबती पाहिजे ना. मी कसा एकाकी राहू शकतो. जा जाऊन लोकांना घासाघीस कर आणि येनकेन प्रकरेण त्यांना ईसाई बनवून टाक. जर सरळ बोटाने तूप निघत नसेल जर बोट वाकडे कर. पण तूप काढ. मग तुझा मार्ग उचित असो वा अनुचित पण करून टाक त्या सर्वांना ईसाई. सोडव त्यांना हया नरकासम हिंदू धर्मातून. आण त्यांना माझ्या स्वर्गात. जरा विचार करा हा ईसाई गॉड आमची किती काळजी वाहतो. आम्हांला आपल्या हया स्वर्गात जागा देण्यासाठी त्याची किती धडपड. किती बेचैनी. आणि आम्ही आहोत जे हिंदू म्हणून टिकून राहू इच्छितो. आमचे काही कर्तव्य नाही का त्या ईसाई गॉडप्रत जो आम्हांस ऐवढे मोठे प्रलोभन देत आहे.*

*असे वाटते की पोपाने मोक्ष म्हणजे एक व्यापार करून टाकला आहे. मोक्षाचा ग्राहक आहे मानव. एक खरेदीदार. आणि विक्री करणारा आहे ईसाई गॉड. यात एका दलालाची आवश्यकता आहे जो हया दोघांचा योग घडवू शकतो. गॉडने निश्चय केला की मला केवळ एकच दलाल पाहीजे. पंचवीस दलालांशी वाटाघाटी करण्यास मला वेळ नाही. माझ्या पसंतीचा एकच दलाल आहे येशू. दलालीची ही प्रवृत्ती येशूच्या अनुयांयामध्ये ऐवढी बोकाळली आहे की त्यांच्यासाठी*

*आयुष्याचा प्रत्येक पैलू जणू दलाली बनून राहिला आहे. विचार केल्यास तुम्हांस अनेक उदाहरणे आढळतील.*

*जर हिंदू धर्मगुरूंच्या कथनानुसार ईश्वर तसेच गॉड एकच असतील तर प्रश्न पडतो पोपास ईश्वरचा प्रत्यक्ष अनुभव आहे का? जर असेल तर त्यांना सत्याचे ज्ञान असेलच. मग त्यांनी ईश्वराच्या नावावर हे असत्य कसे सांगितले की ईसा शिवाय अन्य कोणी मोक्ष देउ शकत नाही. आणि जर त्यांना ईश्वराचे प्रत्यक्ष अनुभव नसेल तर त्यांना सत्याचे ज्ञानच असणार नाही. मग त्यांनी कोणत्या आधारावर असा दावा केला की ईसा एकमात्र मध्यस्थ तसेच एकमात्र मोक्षदाता आहे?*

*कित्येक टी.व्ही. गुरू जे टी.व्ही.चे चॅनेल काही वेळेसाठी भाडयाने घेऊन आपला ज्ञानसागर ओतीत राहतात, ते सर्व वेळोवेळी आपल्या प्रेक्षकांना अन्य धर्मांशिवाय भ्रमित करण्यात स्वतःचा मोठेपणा समजतात. त्यांच्याठायी आणखी काही वैशिष्ट्ये असतात (1) ते वांरवार आपल्या प्रेक्षकांना अशी आठवण देत असतात की सदगुरू विना ईश्वरप्राप्ती संभवत नसते (2) अधूनमधून ते येशूच्या मोठेपणाचेही व्याखान करीत असतात पण सर्वदा असे सांगण्याचे नक्की विसरतात की येशूने स्पष्ट केले होते की कोणी सदगुरू तुम्हांस गॉडपर्यंत पोहचवू शकत नाही मजशिवाय, कारण गॉडने केवळ मलाच या धंद्याचा एकमात्र ठेकेदार बनविले आहे. येशूची बढाई सांगताना जर ही गोष्ट ते चुकूनही आपल्या प्रेक्षकांना सांगते तर त्यांचे प्रेक्षक त्याना बाजूस सारून ईसाकडे झेपावले असते. म्हणूनच ते ही गोष्ट सांगण्याचे सर्वदा विसरतात. हे सर्व टी.व्ही गुरुसुद्धा ईसाई शिक्षणपद्धतीचेच उत्पादन आहे. त्या शिक्षणाचा असा प्रभाव आहे की तुमचे हे सर्वच दिग्दर्शक स्वतःही भ्रमित होतात.*

*हे सर्व पोप तसेच संत, ज्यांच्या चरित्राची चुणूक तुम्ही पाहिली, ते सर्व हया योग्यतेचेही आहेत काय जे तुम्हांस मोक्ष देऊ शकतील असे तुम्हांस वाटते काय?*

हाँ, ते तुम्हांस आपल्या सारखे करू शकतात. मग तुम्ही तुमच्या इच्छेने त्यांच्या संगतीत दुश्चरित्र बना. ना ते मोक्षाचे अधिकारी आहेत ना तुम्ही अधिकारी बनाल.

## आसुरी संस्कृतीची स्वतःची काही वैशिष्ट्ये असतात

(1) मायावी प्रकृती (2) कामातुर प्रवृत्ती (3) धनलोलुपतेची पराकाष्ठा (4) सत्तेप्रत असीमित लालसा तसेच (5) छल कपटात असाधारण रूची.

पुस्तक 28 मध्ये आम्ही (1) आणि (2) संबंधी आपणास काही नमुने प्रस्तुत केले होते. यापैकी (3) ची थोडीशी चुणूक तर तुम्ही येथे पाहिली. पुढील खेपेस जेव्हा आपण भेटू तेव्हा हयाच विषयावर तुम्हांसमोर प्रस्तुत करीन काही चुणूक (4) तसेच (5) ची. यात तर केवळ काही चुणूक होत्या. ईसाई धर्म, ईसाई इतिहास, ईसाई समाजाची सध्याची दशा तसेच दिशा यांचे विस्तृत वर्णन आढळेल 578 पृष्ठांच्या पुस्तक क्रमांक 4 व 10 मध्ये.

## संदर्भ-सूची

आयएसबीएन एक unique क्रमांक आहे ज्याच्याद्वारा या पुस्तकाची ओळख केली जाऊ शकते


विवरण क्रम - ISBN [आवृत्ती] लेखक, शीर्षक

ISBN 0-8400-3625-4 [Pilot Books 1996] King James Version, *Holy Bible*

ISBN 0-14-100437-1 [2000] F Max Muller, *INDIA what can it teach us?*

ISBN 019-565432-3 [2001] *The New Oxford Dictionary of English*

ISBN 81-85990-21-2 [1995] Ishwar Sharan, *The Myth of Saint Thomas and the Mylapore Shiva Temple*

ISBN 81-85990-46-8 [1997] Matilda Joslyn Gage, *Woman, Church and State - a historical account of the status of woman through the Christian ages with reminiscences of the matriarchate*

ISBN 81-85990-52-2 [1998] N S Rajaram, *A Hindu View of the World - Essays in the intellectual Kshatriya Tradition*

ISBN 81-85990-54-9 [1998] Sita Ram Goel, *Pseudo-Secularism, Christian Missions and Hindu Resistance*

ISBN 81-85990-60-3 [2000] David Frawley (Vamadeva Shastri), *How I became a Hindu-my Discovery of the Vedic Dharma*

*Hindu Voice,* a monthly magazine espousing cause of Hinduism, Mumbai

*ॐ नमो नारायणाय!*

मी कोण्या राजनैतिक दलाचा, कोण्या सामाजिक संघटनेचा, कोण्या धार्मिक पंथाचा सदस्य नाही. या पुस्तकांद्वारे मला कसल्या व्यक्तिगत लाभाची अपेक्षा नाही. धन कमाविण्यासाठी मी हे काम करीत नाही. काही सत्ये मला हिंदू माता, बहिणी, पुत्री, पिता, बंधु, पुत्र आदीपर्यंत पोहोचवावयाची आहेत. यांची माहिती त्यांच्या वर्तमानाचे तसेच भविष्याचे रक्षण करू शकते. ज्याप्रकारे ज्ञानाविना ईश्वराची प्राप्ती होत नाही, त्याचप्रकारे ज्ञानाविना समाज तसेच संस्कृतिचे रक्षण होत नसते. माझे प्रयत्न असे असतील की मी तुम्हांस अशा दृष्टीची भेट देऊ शकेत जिच्या आधारे तुम्ही धुंदीचा भेद करून तिच्या पलीकडे पाहू शकाल.

माझा व्यक्तिगत परिचय वस्तुत: काही महत्वाचा नाही, कारण माझी लेखणीच माझी सर्वात उत्तम खूण आहे. पण आज तुमची विचारसरणी अशा काही साचात ओतली गेली आहे की जो पर्यंत तुम्ही माझा व्यक्तिगत परिचय जाणून घेणार नाहीत, की मला किती डिगऱ्या आहेत, कार्यक्षेत्रात माझी लायकी काय होती, आपल्या उदर-भरण्यासाठी मी काय करतो, या सर्वांचा पूर्ण तपशील कळत नाही, तो पर्यंत माझे लेखन वाचण्याजोगे आहे की नाही याचा निर्णय केला जाणार नाही. म्हणून मला आपला व्यक्तिगत परिचय द्यावाच लागेल.

माझ्या जन्मानंतर माझ्या आजोबांनी माझे नाव यशोधर्मन ठेवले होते. एका अशा परिवारात जन्मलो होतो मी जेथे आध्यात्म तसेच उच्च शिक्षणचे प्रचलन अनेक पिढया राहिले होते. माझे पिता सुवर्ण-पदक प्राप्त इंजिनियर होते. आजोबा डॉक्टर होते. पणजोबा शिक्षणतज्ज्ञ तसेच लेखक होते. आजोबांच्या आजोबांनी व्यवसायाचा त्याग करून आपल्या आयुष्याच्या शेवटच्या काळात, संसारात राहूनही एक योगी झाले होते. सर्वांचे थोडेथोडे अंश मला मिळाले. मातृपक्षाकडील आजोबा एक प्रसिद्ध शल्यचिकित्सक होते. माता त्याकाळाच्या मानाने (दृष्टीने) यथेष्ट शिक्षित होती. आपल्या आईबापाची पहिला संतती असल्यामुळे, परंपरेनुसार, माझा जन्म आजोळी 11 माघ (25 जानेवारी) बांकुड़ा (पश्चिम बंगाल) मध्ये झाला होता. अशाप्रकार मी एका "हिन्दु बंगाली" परिवारात जन्मलो, वाढलो. श्री रामकृष्ण परमहंस देवाचा अनन्य भक्तही होतो मी.

विश्वविद्यालयाची डिग्री तसेच भारतवर्ष आणि विदेशातील तीन प्रोफेशनल योग्यतांच्या आधारावर मला कित्येक देशांच्या कॉर्पोरेट-क्षेत्रात उच्चस्तरावर व्यापक प्रशासकीय कार्यभार सांभाळण्याची संधीही मिळाली. या काळात 20 विभिन्न देशांच्या व्यक्तींशी निकटसंपर्कात कार्य करण्याची, तसेच त्यांना जाणण्याची समुचित संधीही मिळाली. पंचेवीस वर्षापर्यंत अथक परिश्रमांनंतर आता मी कार्यनिवृत्त होऊन एकांतवासाचा आश्रय घेतला आहे.

श्री नारायणाच्या दयेने माझ्या जीवनाच्या "व्यक्तिगत" महत्वाकांक्षा तृप्त झालेल्या आहेत. आता मी, आपल्या वेळेच्या तसेच परिश्रमाच्या मोबदल्यात, काहीही इच्छित नाही. यामुळे, मी कार्यात पूर्ण मनोयोगासह एकान्तच इच्छितो. माझे कार्य, केवळ अशा लोकांसाठीच आहे, ज्यांना याची महत्ता ओळखण्याची योग्यता आहे. माझ्याठायी आता कसली इच्छा उरली नाही, की मी अशा व्यक्तींना समजाविण्यात आपला वेळ तसेच आपली ऊर्जा नष्ट करावी, जे माझे म्हणणे समजण्याच्या अवस्थेस अद्याप प्राप्त झाले नाहीत. अशा व्यक्ती, या लेखांची महत्ता तेव्हाच जाणतील, जेव्हा डोई पर्यंत पाणी पोहोचेल आणि बुडून जाण्याची शक्यता त्यांना बरीच 'निकट' दिसू लागेल. तरीही मला आपले दायित्व पूर्ण समर्पणाच्या भावनेने निभावीत जाणे आहे, तसेच ते कर्म श्री नारायणांना अर्पित करीत पुढे जाणे आहे. आज हीच माझी "पूजा" आहे.

 ISBN-13 978-81-89746-**29**-2 ISBN-10 81-89746-**29**-4 (पुस्तक **29**)